मंगळवार, दि. २४ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३१८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मोकाट कुत्र्याच्या हल्ल्यात चिमुकलीच्या मृत्यूप्रकरणी ५० लाख भरपाईची मागणी

### प्रियंका पाटोळे यांचे जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्तांना निवेदन




**जालना | प्रतिनिधी -** जालना शहरातील गांधी नगर परिसरात मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात ७ वर्षांची बालिका संध्या प्रभुदास पाटोळे हिचा ६ मे रोजी दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकारास महापालिकाच जबाबदार असल्याने ५० लाख रुपयाची नुकसान भरपाई महापालिकेने द्यावी, अशी मागणी मयत मुलीची आई प्रियंका पाटोळे यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

प्रियंका पाटोळे यांनी आज सोमवार दि. २३ जून रोजी सामाजिक कार्यकर्ते ड. महेश धन्नावत यांच्या समवेत महानगरपालिकेचे आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात यांनी म्हटले आहे की, गांधीनगर परिसरात उघड्यावर मांस विक्री होत आहे त्यामुळे तिथे मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे. मात्र, महापालिकेकडून मोकाट कुत्र्यांचे लसीकरण झालेले नाही. दि. ६ मे २०२५ रोजी अंगणात खेळत असलेली मुलगी संध्या पाटोळेवर मोकाट कुत्र्यांनी अचानक हल्ला केला आणि या हल्ल्यात तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी गुन्हा दाखल झालेला असून पंचनामाही करण्यात आलेला आहे. या घटनेचा माझ्या संपूर्ण कुटुंबावर खोल मानसिक आघात झाला आहे. मी स्वतः त्या काळात गर्भवती होते आणि या धक्क्यामुळे मला झालेले बाळ सुद्धा काही दिवसांतच मयत झाले. माझे पती मानसिक तणावात असून, दारूच्या आहारी गेले आहेत. मुलीचे आजोबा अंकुश पाटोळे हे सुद्धा शेती करणे बंद करून हतबल अवस्थेत आहेत. आमच्याकडे आता कोणतेही आर्थिक स्त्रोत उरलेले नाहीत. महानगरपालिकेकडून नुकसानभरपाई दिली जाईल, असे आश्वासन दिले गेले होते. मात्र अद्याप कोणतीही मदत मिळालेली नाही. माझ्या मुलीला मोठं अधिकारी बनवायचं स्वप्न होते, ते उद्ध्वस्त झाले आहे. या प्रकारामुळे जालना शहरातील मोकाट कुत्र्यांची समस्या आणि महापालिकेच्या दुर्लक्षित धोरणावर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन महापालिकेने ५० लाखाची नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी प्रियंका पाटोळे यांनी केली आहे.

## मराठी, उर्दू शाळांकडून फीसच्या नावावर होणारी आर्थिक लुट थांबवा

### आम आदमी पार्टीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**जालना | प्रतिनिधी -** शंभर टक्के शासकीय अनुदानीत मराठी व उर्दू माध्यम च्या शाळेत प्रवेश करीता प्रवेश फी च्या नावावर होणारी अवैध आर्थिक लूट थांबवून संबधीत शाळांवर आपण स्वतः संज्ञान घेवून गुन्हे दाखल करावे असे निवेदन आम आदमी पार्टीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आले.
आज दि.२२ रविवार रोजी सायंकाळी सहा वा. दरम्यान मिळालेल्या माहीतीनुसार जालना शहरातील बहुतांश १०० % टक्के शासकीय अनुदानीत मराठी व उर्दू माध्यम च्या शाळेत प्रवेश करीता प्रवेश फी च्या नावावर विद्यार्थी व पालकांची अवैध लूट सुरू आहे, काही शाळात सेमी ईंग्रजी माध्यम च्या नावावर थेट ५,000/- (अक्षरी पाच हजार रुपये) प्रवेश फी ची मागणी करून व मासिक फी च्या स्वरूपात ठारावीक रकम अवैध रीत्या गोळा करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे मोफत व सक्तीचे शिक्षण चा कायदा व संदर्भीय कॅपिटेशन फी घेण्यास बंदी कायदा असतांना ही 0१ ली ते १0 वी पर्यंत विद्यार्थीयांनी प्रवेश करीता शाळेत भेट दिल्यावर शाळांकडून आम च्याकडे जागा रीक्त नाही किंवा येणकेण कारण दाखवून प्रवेश नाकारण्यात येते पालकांनी वसीलेबाजी-विनंती केल्यावर त्यांना असे सांगण्यात येते की प्रवेश देण्यात येईल परंतु आपणास सदरील प्रवेश करीता प्रवेश फी द्यावी लागेल तदनंतर प्रवेश फी ची तडजोड रक्कम फायनल झाल्यावर प्रवेश



ची प्रक्रीया सुरू करण्यात येते, काही शाळांनी तर पैशे गोळा करण्या करीता खाजगी ईसमांना नियुक्त केलेले आहे. पालकवर्ग त्यांच्या पाल्यांचे शैक्षणिक नुकसान होईल या भितीपोटी ने सदरील शाळांची तक्रार करीत नाही. या निवेदन द्वारे पान २ वर

### अल्पसंख्यांकांसाठी महामंडळाकडून नवीन योजना सुरु झाल्याचा सोशल मीडिया संदेश

## कथित दलालांपासून सावधान

**जालना | प्रतिनिधी -** मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत व्यवसायासाठी डिलीव्हरी बॉय, वाहन कर्ज आदि नवीन योजना सुरु करण्यात आलेल्या आहेत. या प्रकारची अफवा सोशल मीडिया तसेच कथित दलालाद्वारे पसरविल्या जात आहे. तरी अशा प्रकारच्या कोणत्याही नवीन योजना सुरु करण्यात आलेल्या नसल्याने या अफवांपासून तसेच आर्थिक फसवणुकीपासून सावधानता बाळगावी, असे आवाहन संचालक शाह आलम खान व जिल्हा व्यवस्थापक एकनाथ कांबळे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.
मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त निगम यांच्याकडून कर्ज स्वरुपात उपलब्ध होणाऱ्या निधीतून शैक्षणिक कर्ज, मुदत कर्ज, सुक्ष्म पतपुरवठा कर्ज अशा प्रकारच्या विविध योजना राबविल्या जातात. सद्यस्थितीत शैक्षणिक कर्ज योजना ही एकमेव चालु आहे तर बाकीच्या पान २ वर

युवा आदर्श

### लाडकी (?)...

बहीण माझी लाडकी
शिक्का बसे सरकारी
अनुदान ये खात्यात
धन्य अनंत उपकारी
मते साधली बरोब्बर
हुशार सावध शिकारी
बहिणाबाई ओवळते
विजय मिळे सत्कारी
निकष लावले कडक
आता फिरे अधिकारी
इन्कमटॅक्स भरणारे
कोण कोणते भिकारी
चार चाकी कुणा दारी
बोचणारे प्रश्न विचारी
फटा फटा पैसे जमा
आधी होते अविचारी
रकमा जमा खात्या
करू ठेवली उधारी
बंद मध्येचं अनुदान
किती करता गद्दारी
आता लावले निकष
डोळ्यां समोर अंधारी
तपासले नाही आधी
कसे बनला गांधारी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## पांडुरंगाची भक्ती; सोनुने गुरुजींच्या दिंडीची अनेक वर्षांची परंपरा

**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** कुंभारझरी येथील वारकरी धर्मसंकीर्तन प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी काढण्यात येत असलेल्या कुंभारझरी ते पंढरपूर या पायी दिंडी सोहळ्याला शुक्रवारी प्रारंभ झाला. येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरापासून या दिंडीची सुरुवात झाली. तत्पूर्वी गावातून वारकऱ्यांची टाळ-मृदुंगाच्या गजरात भव्य मिरवणूक काढली. येथील कीर्तनकार सोनुने गुरूजी यांच्या प्रेरणेने मागील अनेक वर्षांपासून हा पायी दिंडी सोहळा सुरू करण्यात आला आहे.
ग्रामीण भागातून स्वग्राम ते पंढरपूर अशी थेट जाणारी ही एकमेव दिंडी आहे. यात ५00 पेक्षा अधिक वारकरी सहभागी होतात. २० जून ते ५ जुलै असा २० दिवसांचा प्रवास करून ही दिंडी ५ जुलै रोजी पंढरपूरला जाईल. अनेक वर्षांपासून हा सोहळा सुरू असल्याचे मुख्य मार्गदर्शक साळुबा सोनुने गुरूजी यांनी सांगितले.
२० दिवसांचा प्रवास करून दिंडी ५ जुलैला पंढरपुरात जाणार.
शुक्रवारी कुंभारझरी येथून पंढरपूरकडे प्रस्थान करताना कुंभार जरी तालुका जाफराबाद जिल्हा जालना ते पंढरपूर या दिंडीचे आयोजन

**शिस्तीत भक्ती दिंडीचे खास वैशिष्ट्य**

या दिंडी सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे या दिंडीत सहभागी सर्व महिला व पुरुषांना विशिष्ट अशा गणवेशात संपूर्ण प्रवास करावा लागतो. यात पुरुषांना पांढरा ड्रेस तर स्त्रियांना पिवळी साडी परिधान करावी लागते. संपूर्ण प्रवासात हे वारकरी अतिशय शिस्तबद्ध रितीने प्रवास करून हा सोहळा पूर्ण करतात. अतिशय गरीब कष्टकऱ्यापासून कोट्यधीश उद्योगपतीपर्यंत प्रत्येकजण या दिंडीचा वारकरी असतो. शिस्तीत भक्ती हेच या दिंडीचे खास वैशिष्ट्य

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर यात्रा भरते. या पंढरपूर रात अनेक दिंड्यांचं आगमन होत असते. कुंभारझरी टेंभुर्णी पासून दहा किलोमीटर अंतरावर असलेलं छोटसं गाव. ज्या गावात सोनुने गुरुजी हे कीर्तनकार हरिभक्त परायण अध्यात्म या सर्व गोष्टींमध्ये निपुण असं व्यक्तिमत्व. अनेक सामाजिक धार्मिक अध्यात्मिक कार्यक्रमांमध्ये झोकून देणार ही व्यक्तिमत्व. या हरिभक्त परायणाने या दिंडीचा आयोजन अनेक वर्षापासून केलेलं असून या दिंडीमध्ये अनेक लोक सहभागी होतात. दरवर्षी वीस दिवसाचा पायी प्रवास करून ही दिंडी पंढरपुरात पोहोचत असते. अनेकांना भक्ती मार्ग नामस्मरण, विठ्ठलाची भक्ती काय असते हे दाखवून देण्यासाठीच हरिभक्त परायण सोनुने गुरुजींनी ही दिंडी सुरू केलेली आहे. पंढरपूर पर्यंत अनेक मोठमोठ्या गावांमध्ये या दिंडीचा मुक्काम असतो. या प्रत्येक ठिकाणी भक्ती, नामसंकीर्तन, भारुड भक्तिमय अभंग अशा अनेक, वारकरी या सगळ्यांचा आस्वाद घेत असतात आणि ज्या ठिकाणी मुक्काम ला असतील तेथे अध्यात्मातून नाम संकीरणातम भक्ती कशी करावी हे तेथील परिसरातील लोकांना सांगितल्या जाते. सर्व दुःख विसरायला लावणारे भक्तिमार्ग म्हणजे पंढरीच्या पांडुरंगाची भक्ती. त्याच भक्तीचा आधार घेत हरिभक्त परायण सोनुने गुरुजींनी या दिंडीचं आयोजन अनेक वर्षापासून केलेलं आहे. या दिंडीचे प्रस्थान पंढरपूरकडे सुरू झालेले आहे.

## शेतकऱ्यांना पीककर्ज मिळवून देण्यासाठी भारतीय स्टेट बँकेच्या मॅनेजर यांना निवेदन



**परतूर | प्रतिनिधी -** परतूर शहरातील भारतीय स्टेट बँक व उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे शिवसेना जिल्हाप्रमुख महेश नळगे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपजिल्हाप्रमुख माधवराव मामा कदम, अशोकराव आघाव तालुका प्रमुख भारत पंडित यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी शेतकऱ्यांना पीककर्ज मिळवून देण्यासाठी , खात्यावर होल्ड काढण्यासाठी, सिबिल आर्ट रद्द करण्यासाठी भारतीय स्टेट बँकचे मॅनेजर यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी शिवसेना शहर प्रमुख दत्ता पाटील सुरूग, दलीत आघाडी तालुका प्रमुख मधुकर पाईकराव , उपतालुका प्रमुख प्रभाकर खंदारे, गणेश दराडे, उप सरपंच विठ्ठल राव वटाणे, किसान सेना तालुकाप्रमुख राजू शिंदे, गणपत खोसे, तुकाराम बोरकर, वसंत बरकुले, दादाराव बरकुले, दिलीप निकम , गोपाळ माने, भगवान काकडे, राजेंद्र तांगडे, केदार दराडे, शुभाष घुगे, रमेश घुगे, फकीरराव, बोडखे यासह अनेक शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## सुरेशकुमार जेथलिया यांच्यामुळे निष्ठावंत पदाधिकारी नाराज

### पदाधिकाऱ्यांचे जेथलियांकडून खच्चीकरण; विठ्ठलराव बरकुले यांचा आरोप

**परतूर | प्रतिनिधी -** दोन महिन्या अगोदर शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या नितीन जेथलियाला राष्टवादी युवक सरचिटणीसपदी नियुक्त केल्याने परतुर मंठा विधानसभा मतदार संघातील निष्ठावंत कार्यकत्यांना धक्का बसला असु जुन्या निष्ठावंत कार्यकत्याला पक्षातुन काढण्या करिता सुरेशकुमार जेथलिया षडयंत्र रचत असल्याचा आरोप राष्टवादी क्रांग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष विठ्ठलराव बरकुले यांनी केला. या आरोपामुळे मंठा-परतूर राष्ट्रवादीत खळबळ उडाली आहे. काहींच्या मते श्री बरकुले यांचे आरोप योग्य असून काहींनी मात्र, यास त्यांचे मत असल्याचे सांगून नामानिराळे राहणे पसंत केले आहे.
श्री बरकुले म्हणाले की, पक्षाच्या कठीण काळात तालुक्यात राष्टवादी काँग्रेस पक्षाला गाव वाडया खेड्यापर्यत पोहचविण्याच काम आम्ही केले आहे. परंतु जेव्हा सत्ता आली तेव्हा आयत्या पिठावर रेघा मारणारे अनेक संधी साधु नेते मंडळी आपली कातडी वाचविण्या करिता पक्षात येत आहेत.ज्यामुळे खऱ्या निष्ठावंत कार्यकत्यावर अन्याय होत असुन यावर पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.



परतुर मंठा विधानसभा मतदार संघात माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया आपल्या जवळच्या लोकांची पक्ष पातळीवर तालुका अध्यक्ष, शहर अध्यक्षपदावर निवड करण्याकरिता पदाधिकारी बदलण्याच्या हालचली करत आहेत. परतुर- मंठा विधानसभा मतदार संघात गेल्या वीस पंचवीस वर्षांपासुन निष्ठावंत असणारे पदाधिकारी - कार्यकर्ते सुरेशकुमार जेथलिया यांच्या अचानक सुरु केलेल्या पक्षातील पदाधिकारी बदलण्याच्या कामामुळे निष्ठावंत कार्यकर्ते नाराज झाले असुन पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्या कार्यकर्ते पदाधिकारी यांना पदाहून बाजूला सारून जेथलिया त्यांच्या विचारधारेच्या माणसांची निवड करुण निष्ठावंत कार्यकत्याला संपविण्याचे षडयंत्र रचत असल्याचा गंभीर आरोप श्री बरकुले यांनी केला आहे. यामुळे आता माजी आ. जेथलिया यांच्या बाबत पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतात हे काळच ठरवेल.

# संपादकीय

## अमेरिकेचे कुटील धोरण

सध्या अमेरिकेला पाकिस्तान प्रेमाचा भलताच उमाळा आहे. पाकिस्तान हा दहशतवाद पसरवणारा जगातील पहिल्या क्रमांकाचा देश असून पाकिस्तान हीच दहशतवादाची फॅक्टरी आहे हे माहीत असूनही अमेरिका पाकिस्तानसाठी पायघड्या घालत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे तर पाकिस्तान प्रेम उतू चालले आहे. पाकिस्तान आपल्यासाठी खास देश आहे असे वक्तव्य त्यांनी नुकतेच केले आहे इतकेच नाही तर पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल मुनीर यांनी यांना त्यांनी व्हाइट हाऊसमध्ये खास निमंत्रण देऊन त्यांच्यासोबत जेवण करत त्यांची सरबराई केली. अमेरिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी एखाद्या देशाच्या लष्करप्रमुखाला बोलावून त्याचा इतका मोठा सन्मान केला आहे. व्हाइट हाऊसमध्ये देशाचे प्रतिनिधी म्हणून देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधान किंवा मंत्र्यांना निमंत्रित केले जाते. पाकिस्तानचे जनरल जिया - उल - हक, जनरल आयुब खान आणि जनरल परवेज मुशर्रफ यांना व्हाईट हाऊसने निमंत्रण दिले होते पण ते पाकिस्तानचे लष्करप्रमुख म्हणून नव्हे तर पाकिस्तानचे राष्ट्रपती म्हणून. व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या या भेटीत या दोघांत विविध विषयांवर चर्चा झाली. या चर्चेनंतर ट्रम्प यांनी भारत पाकिस्तान युद्ध आपणच थांबवल्याचा पुनरुच्चार केला. पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिफ मुनीर यांनी भारत पाकिस्तान युद्ध थांबवल्याबद्दल ट्रम्प यांचे आभार मानून भारत पाकिस्तान युद्ध थांबल्याबद्दल ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार देण्याची मागणी केली. हे सर्व अचंबित करणारे आहे. ज्या पाकिस्तानमुळे जगात दहशतवाद पसरत आहे त्याच पाकिस्तानच्या लष्करप्रमुखाला ट्रम्प बोलावतात त्यांच्यासोबत जेवण करतात. हा ट्रम्प यांचा दुटप्पीपणाच आहे. दहशतवादा विरोधातील लढाईत अमेरिकेचे धोरण किती संधीसाधू आणि स्वार्थी आहे हेच यातून दिसून येते. जनरल आसिफ मुनीर यांना भेटून ट्रम्प काय साध्य करू इच्छितात? ज्या पाकिस्तानला भारत क्रमांक एकचा शत्रू मानतो त्या पाकिस्तानला जवळ करण्यामागे ट्रम्प यांचा उद्देश काय ? असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर इराण इस्राईल यांच्यात सुरू असलेल्या युद्धात मिळेल. मागील आठवड्यात इस्राईलने इराणच्या आण्विक केंद्रावर हल्ला केला. याला प्रतिउत्तर म्हणून इराणनेही इस्राईलवर मोठा हल्ला केला. या हल्ल्यात दोन्ही देशांचे शेकडो नागरिक आणि सैनिक मरण पावले. हा संघर्ष अजूनही चालू आहे. या युद्धाआधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचे सर्वोच्च नेते आयातुला खोमेनी यांना अमेरिकेशी आण्विक करार करण्याची गळ घातली मात्र खोमेनी यांनी ती स्पष्टपणे नाकारली. जर तुम्ही आमचे ऐकणार नसाल तर तुम्हाला त्याची किंमत मोजावी लागेल अशी धमकीच ट्रम्प यांनी तेंव्हा खोमेनी यांना दिली होती. त्यानंतर काही दिवसातच इस्राईलने इराणवर हल्ला केला याचाच अर्थ अमेरिकेच्या चिथावणीवरूनच इस्राईलने हा हल्ला केला. एकीकडे भारत पाकिस्तान युद्ध मी थांबवले असा डंका पिटत स्वतःला नोबेल पुरस्कार देण्याची मागणी करायची दुसरीकडे इस्राईल आणि इराणमध्ये युद्ध पेटवून द्यायचे. ट्रम्प यांचा हा कुटील डाव आता जगाच्या समोर आला आहे. इस्राईलने इराणवर हल्ला करूनही इराण आपले ऐकत नाही हे लक्षात आल्यावर ट्रम्प यांनी या युद्धात इस्रायलच्या बाजूने उतरण्याची धमकी दिली. या धमकीलाही इराणने जुमानले नाही त्यामुळे ट्रम्प तात्यांचा तिळपापड झाला आणि अखेर रविवारी अमेरिकेने या युद्धात प्रत्यक्ष भाग घेत इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ला केला. या हल्ल्यानंतर संपूर्ण जगभर खळबळ माजली असून अमेरिकेने या युद्धात प्रवेश करणे ही तिसऱ्या युद्धाची नांदी ठरू शकते असे जाणकार म्हणत आहेत. कारण या हल्ल्यानंतर इराणला अनेक देशांनी पाठिंबा दिला असून अमेरिकेचा निषेध केला आहे. या हल्ल्यानंतर इराणने रशियाशी संधान बांधले असून रशियाने इराणला पाठिंबा दिला आहे. अमेरिकेने पुन्हा इराणवर हल्ला केला तर रशिया इराणच्या बाजूने युद्धात उतरेल असे आश्वासन इराणला रशियाने दिले आहे. जर रशिया या युद्धात उतरलाच तर तिसऱ्या महायुद्धाला तोंड फुटेल. अशा अवस्थेत अमेरिकेला आशिया खंडात स्वतःचा हक्काचा लष्करी तळ हवा आहे आणि पाकिस्तान हा त्यासाठी सर्वात सोईस्कर आणि योग्य देश आहे अशी त्यांची धारणा आहे. भविष्यात इराण आणि रशिया विरुद्ध लढ्यासाठी पाकिस्तानची भूमी वापरता यावी यासाठीच ट्रम्प यांची ही खेळी आहे. पाकिस्तानला चुचकारण्यामागे ट्रम्प यांचा हाच उद्देश आहे. अर्थात पाकिस्तानच्या हे लक्षात न येण्याइतका पाकिस्तान दुधखुळा नाही. पाकिस्तानला हे माहीत असूनही पाकिस्तान ट्रम्प यांच्या जाळ्यात अडकतोय कारण त्यात त्यांचाही स्वार्थ आहे. भविष्यात जर भारताने ऑपरेशन सिंदूर सारखी कारवाई केली तर अमेरिकेने पाकिस्तानची बाजू घ्यावी असे त्यांना वाटते म्हणजेच या भेटीमागे अमेरिका आणि पाकिस्तान या दोन्ही देशांचा स्वार्थ आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी हे दोन्ही देश जगाला युद्धाच्या खाईत लोटत आहेत म्हणूनच या दोन्ही स्वार्थी देशांविरुद्ध जगाने एक होण्याची गरज आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# माणसाच्या जीवापेक्षा पैसा महत्त्वाचा असतो का?

आजकालची माणसे पैशाला जीवापाड जपताना दिसतात. पैशाला जीवापेक्षा जास्त महत्त्व देऊन पैसा सांभाळताना दिसतात. म्हणजे त्यांना जीवापेक्षा जास्त पैसा प्रिय वाटत आहे. म्हणून आजकालची माणसे स्वतःच्या जीवाचा जराही विचार न करता, अहोरात्र पैसा कमावताना दिसतात. दिवसभर चांगल्या मार्गाने पैसा कमवायचा आणि रात्रभर वाईट मार्गाने पैसा मिळवायचा हे सूत्र माणसाने अमलात आणले आहे.बेकायदेशीर मार्गाने पैसा मिळवून झटपट श्रीमंत होण्याची स्वप्न पाहणारा माणूस आजकाल पैशाला खूपच महत्त्व द्यायला लागलाय. पैसा कमावण्याच्या नादात त्याला स्वतःच्या जीवाकडे देखील लक्ष द्यायचे भान राहिले नाही. इतका बेभान होऊन माणूस पैसे कमवताना दिसत आहे. पैशाला एवढा आसुसलेला आहे की, त्याला पैसा म्हणजे या जगातील सर्वात महत्त्वाची बाब वाटत आहे. पैसा हेच सर्वस्व समजून पैशापुढे माणूस लोटांगण घालत आहे. म्हणून तो सारखा पैसा पैसा करताना दिसत आहे. स्वतःच्या जीवापेक्षा जास्त पैशाला महत्त्व देणारी माणसे पाहिल्यावर माझ्या मनाला प्रश्न पडतो की, खरंच जीवापेक्षा जास्त पैसा महत्त्वाचा असतो का? पैसा आपल्यासाठी खरंच एवढा प्राणप्रिय आहे का? पैसा आपल्यासाठी असतो का आपण पैशासाठी असतो? याचाही विचार करणे काळाची गरज आहे. आजकालचा माणूस पैसा कमवण्याच्या नादात एवढा मग्न झाला आहे की, त्याला पैशापुढे स्वतःचे शरीर, स्वतःचे आईवडील, आजी आजोबा, बहिण भाऊ, नातेवाईक व मित्रपरिवार यांच्यासाठी वेळ द्यायला देखील त्याच्याकडे वेळ राहिला नाही. एवढा माणूस पैसा कमावण्यात व्यस्त झाला आहे.अहोरात्र पैसा पैसा करत आहे आणि पैशाच्या मागे मृगजळाप्रमाणे सुसाट वेगाने धावत आहे. माणसांनो पैसा जरूर कमवा कारण जीवन जगण्यासाठी ज्याप्रमाणे अन्न आणि पाण्याची गरज आहे, त्याप्रमाणेच जीवन जगण्यासाठी पैशाची सुद्धा तेवढीच नितांत गरज आहे. मान्य आहे की, पैशाशिवाय या जगात माणसाचे अनेक काम अडकतात आणि पैसा फेकला की, माणसाची कामे झटपट होतात. आपल्याकडे पैसा असेल तर आपल्यापुढे मित्रपरिवार व नातेवाईक गोंडा घोळायला लागतात. पण जोपर्यंत आपल्याकडे पैसा आहे तोपर्यंतच ही माणसे आपल्या मागे फिरतात. आणि एकदा आपल्याकडील पैसा संपला की, मग ती माणसे देखील आपल्यापासून लांब जातात. म्हणून पैशापेक्षा माणसे महत्त्वाची असतात. म्हणजे पैसा शेवटपर्यंत टिकत नसतो पण जोडलेली माणसे मात्र आयुष्यभर सोबत राहतात.आपण जोडलेली माणसेच शेवटपर्यंत आपल्याला साथ देतात. आपल्या सुखदुःखात धावून येतात. संकट काळात आपल्याला मदत करतात. म्हणून सगळीच कामे पैशाने होतात असे नाही, माणसाची सामाजिक प्रतिष्ठा असेल, माणसाची समाजात किंमत असेल आणि माणसात माणुसकी असेल तर माणसाची कामे पैशाशिवाय झटपट होतात हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणून माणसाने पैसा तर कमवावाच पण अगोदर जिवाभावाची माणसे जोडायला हवीत कारण सध्या ती काळाची गरज बनली आहे. म्हणून बांधवांनो पैसाही कमवा आणि मानसेही कमवा या जगात पैशाला पण किंमत आहे आणि माणसांना पण किंमत आहे. पण पैशाला जीवापेक्षा जास्त महत्त्व देत बसू नका. पैसा आपल्यासाठी असतो पण आपण पैशासाठी नसतो, हे लक्षात ठेवा. पण आजकालचा माणूस जीवापेक्षा जास्त पैशाला महत्त्व आहे. पैसा खर्च होतो म्हणून आजारी पडल्यावर स्वतःला चांगल्या रुग्णालयात दाखल करत नाही. पैशाची बचत करण्यासाठी माणूस मेडिकलच्या गोळ्या खाऊन आजार बरा करण्याचा प्रयत्न करतो पण मेडिकलच्या गोळ्यांनी आजार बरा न होता आणखी बळावतो. हे त्यांना कोण सांगणार? एका श्रीमंत व्यक्तीला मोठा आजार झाला होता. त्या आजाराने ती व्यक्ती ग्रस्त होती. पण तो श्रीमंत व्यक्ती फार कंजूष होता. तो जीवापेक्षा जास्त पैशाला महत्त्व द्यायचा. त्याच्याकडे अमाप पैसा होता. पण तरी देखील तो मोठ्या हॉस्पिटलमध्ये स्वतःचा उपचार करत नव्हता. कारण त्याला वाटायचे की, मोठ्या हॉस्पिटलमध्ये गेल्यावर तिथे खूप पैसा भरावा लागतो. आपला खूप पैसा जाईल. म्हणून तो मेडिकलच्या गोळ्या खायचा, साध्या दवाखान्यात उपचार करायचा आणि जीवन जगायचा. त्या दवागोळ्यांनी त्याला तात्पुरते बरे वाटायचे. पण कालांतराने त्याचा आजार बळावत गेला. आणि शेवटी त्याचा मृत्यू झाला. जर तेव्हाच त्याने चांगल्या हॉस्पिटलमध्ये स्वतःला दाखवून चांगला उपचार केला असता तर त्याचा जीव वाचला असता. पण त्याला जीवापेक्षा जास्त पैसा महत्त्वाचा वाटला. म्हणून त्याला मृत्यू अवेळी गाठला. शेवटी त्याला सगळा पैसा व संपत्ती जाग्यावर सोडून रिकाम्या हाताने जावे लागले. एवढा कंजूषपणा काय कामाचा? कुठे स्वतःच्या जीवापेक्षा जास्त पैसा महत्त्वाचा असतो का? काही माणसे असेही असतात की, ते घरामध्ये स्वतःच्या जीवाला खाण्यासाठी चांगले पदार्थ व महागड्या वस्तू कधीच आणत नाहीत. आपल्या मुलाबाळांना महागडे शैक्षणिक साहित्य घेऊन द्यायला त्यांना नको वाटते. कारण पैसा जास्त जातो. ही कंजूष माणसे स्वतःबरोबर दुसऱ्यांच्या जीवाचा देखील विचार करत नाहीत. घरातील पत्नी आजारी पडू किंवा मुले आजारी पडू हे महाशय कधीच वेळेवर त्यांना दवाखान्यात दाखल करत नाहीत. त्यांना चांगल्या हॉस्पिटलमध्ये दाखवत नाहीत. ग्रामीण रुग्णालयात दाखल करून कमी पैशात उपचार करण्याचा प्रयत्न करतात. दुसरी एक खेदाची बाब म्हणजे घरातील वृद्ध आईवडील आजारी पडल्यावर हे महाशय त्यांना चांगल्या हॉस्पिटलमध्ये भरती न करता शासकीय रुग्णालयात ॲडमिट करून मोकळे होतात...कारण शासकीय हॉस्पिटलमध्ये उपचार कमी खर्चात होतो आणि खाजगी हॉस्पिटलमध्ये भरपूर पैसा ओतावा लागतो, म्हणून हे कंजूष लोक टाळाटाळ करतात.

दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मी काही दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात एक बातमी वाचली होती. ती बातमी अशी होती की, एका श्रीमंत घरातील श्रीमंत बापाच्या श्रीमंत मुलाची. त्या मुलाच्या बापाकडे भरपूर संपत्ती व पैसा होता, परंतु त्याचा बाप खूप कंजूष होता. त्याला आलेला पैसा लावून ठेवायची सवय होती. तो पैशाचा कमीत कमी वापर करायचा. आणि होता होईल तेवढी बचत करायचा. या कंजूष बापाला मुलगा एकुलता एक होता. पण त्याला पैशापुढे मुलगा देखील अमुल्य वाटत होता. त्या मुलाला कोणता तरी आजार झाला होता. आणि तो मुलगा मरणाच्या दारात उभा होता. त्याला त्याच्या बापाने एका हॉस्पिटलमध्ये नेऊन ॲडमिट केले. डॉक्टरांनी तपासल्यावर कळाले की, याला खूप मोठा आजार झाला आहे... तो वाचेल याची काही शाश्वती देता येत नाही पण प्रयत्न करून बघू, वाचेल सुद्धा! असे डॉक्टर म्हणाले. पण त्याला खूप मोठा खर्च लागेल. तुम्हाला तो खर्च झेपेल का? मला विचार करून सांगा की, त्याच्यावर उपचार करायचा की, त्याला घरी घेऊन जायचे? हे तुम्ही ठरवा. तेव्हा त्या कंजूस बापाच्या पायाखालची जमीन सरकली आणि त्याने निर्णय घेतला की, मुलगा मेला तरी चालेल पण या मुलाला एवढा खर्च मी करू शकत नाही... असे या निर्दयी व निष्ठूर बापाने डॉक्टरांना ठामपणे सांगितले. आणि तो निर्दयी बाप त्या मुलाला घरी घेऊन आला. आणि काही दिवसातच त्या मुलाची प्राणज्योत मालवली. बापाने जर पैसा लावला असता. तर त्या मुलाचा जीव नक्कीच वाचला असता. पण त्या बापाकडे पैसा असून देखील त्याला त्या मुलाच्या जीवापेक्षा पैसा महत्त्वाचा वाटला. आणि त्या बापाने एकुलता एक मुलगा केवळ पैशावाचून मारून टाकला... ही बातमी वाचून माझे मन सुन्न झाले.. आणि लगेच माझ्या मनात एक प्रश्न तरळला की, खरंच माणसाच्या जीवापेक्षा पैसा महत्त्वाचा असतो का? तेव्हा जाता जाता एवढे सांगावे वाटते की, बांधवांनो जीवापेक्षा पैसा महत्त्वाचा नाही... जीवनात पैसा कितीही कमावता येतो पण एकदा गेलेला जीव परत कधीच मिळवता येत नाही, म्हणून पैशापेक्षा माणसाच्या जीवाला महत्त्व द्या... पैसा आपल्यासाठी असतो आपण पैशासाठी नसतो... हे लक्षात ठेवा...

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली जिल्हा परिषदेच्या क्रीडा प्रबोधिनीला भेट



**जालना । प्रतिनिधी -** राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सोमवार दि.२३ जुन २०२५ रोजी सकाळी ७ वाजता जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनीला भेट दिली. तसेच निवासी क्रीडा प्रबोधिनीची आतापर्यंत झालेल्या प्रगतीची माहिती जाणून घेत समाधान व्यक्त केले.

क्रीडा प्रबोधिनी येथील मुलांनी आतापर्यंत मिळवलेल्या सर्व चषक यांची मंत्री श्री.भुसे यांनी पाहणी केली त्याचबरोबर क्रीडा प्रबोधिनी येथील विद्यार्थ्यांसोबत तसेच पालकांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळात प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षीस दिले. क्रीडा प्रबोधिनीची आजपर्यंतची वाटचाल कशी झाली व त्याच्यासाठी निधी कुठून जमा केला हे सर्व माहिती घेतली. जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी जिल्हा परिषदेच्या मुलांसाठी चालविलेली एक आगळीवेगळी क्रीडा प्रबोधिनी आहे हे ऐकल्यानंतर त्यांना आनंद झाला. क्रीडा प्रबोधिनीची वाटचाल निर्विवादपणे चालू ठेवण्यासाठी निधी देण्याचे मंत्री श्री. भुसे यांनी यावेळी आश्वासन दिले.

याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार, शिक्षण उपसंचालक श्री. मुकुंद, शिक्षण निरीक्षक सतीश सातव, शिक्षणाधिकारी बाळू खरात, शिक्षणाधिकारी श्रीमती सानप, भाऊसाहेब घुगे, पंडित भुतेकर, शैलेश घुमारे, उपशिक्षणाधिकारी श्याम देशमुख, गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे, सुभाष भालेराव, विनया वडजे, शिक्षक संघटनेचे अरुण जाधव, रवींद्र काकडे, प्रभाकर शिंदे, सुनील मावकर, प्रमोद खरात, प्रकाश कुंडलकर, क्रीडा प्रबोधिनीतील कर्मचारी आदि उपस्थित होते.

## दिखावा आणि समाजकार्य

नका करू बांधवांनो नुसता दिखावा
होईल तुमचाच एकदिवस पचतावा
कृती करून दाखवा समाज बांधवांना
गावातील सज्जन आणि सभ्य माणसांना
आपण समाजकार्य करत आहात थोडे
पण गावात नाचवत आहात कागदी घोडे
अशाने गावकरी तुम्हाला मारतील जोडे
अशा खेळाने समाज कसा जाईल पुढे?
दिखावा करून सन्मान मिळवता
जादा काम केल्याचा आव आणता
स्वतःला कार्यकर्ता म्हणून मिरवता
गावभर चर्चा करून जनतेला फसवता
काम तर कोणते करू वाटत नाही
पुरस्काराची हाव काही सुटत नाही
एखाद्या नेत्याच्या दावणीला पडायचे
त्याचेच खाऊन त्यालाच गद्दार व्हायचे
गावात येऊन नुसता दिखावा करायचा
तालुक्याला जाऊन रुबाब गाजवायचा
आपल्याच नेत्याला लय भारी म्हणायचे
माघारी मात्र त्याला घाण घाण बोलायचे
नेतेगिरीचा दिखावा काय कामाचा हो?
एकदिवस आपलाच होईल सत्यानाश हो
कित्येक नेते राजकारणात बुडाले आहेत
घरदार व शेती विकून बरबाद झाले आहेत
राजकारणात आपण जरूर उतरावे
पण आधी खूप खूप शिक्षण शिकावे
अगोदर स्वतःच्या पायावर उभे राहावे
आणि मग राजकीय क्षेत्रात उतरावे

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**

## वाचकांचे मनोगत

# पावसाळ्यातील सहली जीवावर बेतणाऱ्या

पावसाळ्यातील धबधबे पर्यटकांची आकर्षण स्थळे.प्रती वर्षी पावसाळ्यातील धबधब्याच्या मनसोक्त आनंद घेण्यासाठी विविध शासकीय/ निमशासकीय/ खाजगी कंपण्यातील / सामाजिक संस्था/ क्रीडा मंडळे / मित्र परिवार दरवर्षी पर्यटनाकरिता बाहेर पडतात. शुक्रवार कार्यालयाच्या वेळेनंतर खाजगी गाड्याने इच्छित पर्यटनस्थळे गाठतात. तेथील धबधबे,नद्या,ओहळ यांची माहिती नसते.पाणी किती खोलवर आहे.मारक जागा यांची माहिती नसते.वाहत्या पाण्याचा मोह आवरत नाही आणि अघटीत घडते.नुकत्याच झालेल्या पर्यटन स्थळांवरील अपघाताने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. केदारनाथ ,इंद्रायणी पूल येथील अपघातात अनेकांना प्राणाला मुकावे लागले.लोणावळा ,कर्जत, रायगड,रत्नागिरी,सिंधुदुर्ग, खोपोली,डहाणू,वाडा,भिवंडी,पुणे येथे दरवर्षी पर्यटक पर्यटनासाठी येतात तेव्हा तेथील शासकीय यंत्रणा धोका असलेल्या जागा बंद का करित नाहीत. इंद्रायणी पूल धोकादायक असल्याचा फलक दर्शनी भागात का लावला नाही.पूल वाहतुकीस बंद का केला नाही.पर्यटकहो,वाहत्या पाण्याचा मोह आवरत नाही हे जरी खरे असले तरी तुमच्या जीवाचे बरेवाईट झाले तर तुमच्या घरच्यांनी कोणाकडे पाहायचे याचा मनाशी विचार करा.शासकीय यंत्रणेतील संबंधित अधिकार्यांना अपघातात जर तुमचे बरेवाईट झाले तर काही देणे घेणे नाही हे लक्षात असू द्या. प्रशासनाची दिरंगाई हेच अपघाताला कारणीभूत आहे.

**महादेव गोळवसकर,**
**कुर्ला** ९८६९४७६२०९,
mahadeogolvaskargmail.com

पान १ वरुन

## मराठी, उर्दू ...

आमची मागणी आहे की जालना शहरातील १00% अनुदानीत मराठी व उर्दू शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये वर्ग बालवाडी ते १0 वी पर्यंत करण्यात आलेल्या सर्व प्रवेशांची पडताळणी करून व संबधीत सर्व पालकांचे जबाब घेवून अवैध फी वसुली करणाऱ्या दोषी शाळांवर महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७ अन्वये आपण स्वतः संज्ञान घेवून यांच्यावर जिल्हा प्रशासन मार्फत गुन्हे दाखल करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन आम आदमी पार्टीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. दिलेल्या निवेदनावर ॲड. फेरोज बागवान, आसीम बागवान, जालना शहराध्यक्ष तनुज बाहेती, उबैदुल्लाह खान, हुजैफा खान ई. च्या स्वाक्षऱ्या आहेत.

## कथित दलालांपासून ...

योजना पुढील आदेशापर्यंत बंद आहेत. तरी अल्पसंख्यांक समुदायातील नागरिकांनी कोणत्याही अमिषाला बळी न पडू नये तसेच कोणी आर्थिक फसवणुक करीत असल्यास संबंधित व्यक्तीविरुध्द जवळच्या पोलिस ठाण्यामध्ये तक्रार नोंद करावी. जेणेकरुन आपली व इतर नागरिकांची फसवणूक होणार नाही. जालना शहरातील दुखी नगर, मिल्लत नगर, तट्टूपुरा आणि कुचरवटा आदि वसाहतीमध्ये काही महिला कर्ज मंजूर करुन देते म्हणून इतर महिलांकडे पैशांची मागणी करीत आहेत. अशा आशयाची तक्रार संचालक शाह आलम खान यांच्याकडे प्राप्त झाली आहे. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# जालन्यात विजेचा शॉक लागून एकाचा मृत्यू

## म्हाडा कॉलनीत घडली घटना

**जालना । प्रतिनिधी -** विजेचा शॉक लागून एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. जालना शहरातील म्हाडा कॉलनीत काल रात्री ऊशिरा ही घटना घडली असून गजानन शेषराव पाचपंडव (वय ४० वर्ष) असं मयताचे नाव आहे. म्हाडा कॉलनीत पालिकेच्या नळाला पाणी आल्याने पाणी भरण्यासाठी मोटर लावत असताना गजानन यांना विजेचा जोराने झटका बसला. या घटनेत त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.



दिनांक २१ रोजी महानगरपालिकेनं रात्रीच्या १०.३० वाजल्यानंतर नळाला पाणी सोडलं.. त्यामुळं नळाला पाणी आलं म्हणून झोपेतून उठून गजानन पाचपांडव हे मोटार सुरु करताना त्यांना जोराचा शॉर्ट लागला. यातच त्यांचा मृत्यू झालाय. दरम्यान महानगरपालिकेनं दिवसा पाणी सोडलं असत तर अशी घटना झाली नसती असा आरोप नातेवाईकांनी केला

घटनेची माहिती मिळताच कदीम जालना पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह शासकीय सामान्य रुग्णालयामध्ये पाठवला रात्री उशीर झाल्याने आज दिनांक २२ रविवार रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास मृतदेहाचे शवविच्छेदन करून नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. दरम्यान माध्यमांशी संवाद साधत असताना नातेवाईकांनी संताप व्यक्त करत महानगरपालिकेवर खापर फोडले महानगरपालिकेने रात्री बे रात्री नळाला पाणी सोडू नये त्यामुळे असे अपघात होत आहेत सकाळी पाच नंतर जर पाणी सोडले किंवा दिवसभर जरी सोडले तरी अशा दुर्घटना होणार नाहीत असा आरोप नातेवाईकांनी केला.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कदीम जालना पोलीस अधीक तपास करत आहे.

### १७ कोटी ५४ लक्ष रुपयांच्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या कामाचे उदघाटन

# मी कार्यकर्ता म्हणून दिवस रात्र जनसामान्यांसाठी काम करतो त्यामुळे सर्वसामान्य जनता माझ्या पाठीशी- आमदार बबनराव लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारा रस्ता वीज पाणी या मूलभूत बाबी उपलब्ध करून देण्यासाठी मी या अगोदरही सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत यापुढे देखील सर्वांगीण विकासासाठी मी लोकप्रतिनिधी म्हणून सदैव तत्पर असेल. गावाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी गावाला दर्जेदार रस्ता असणे अत्यंत आवश्यक आहे दळणवळणाची सुविधा उपलब्ध झाली तर निश्चितपणे गावाच्या विकासाला हातभार लागतो त्याचबरोबर गावासाठी मुबलक फिल्टरचे शुद्ध पिण्याचे आणि मुबलक वीज मिळावी यासाठी देखील मी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

ढोकसाळ, वाघोडा तांडा, बोरगाव व ढगी या गावांमध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते यावेळी पुढे बोलताना लोणीकर म्हणाले की केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार व राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार यांच्या माध्यमातून अनेक लोककल्याणकारी योजना राबविण्यात येत असून या सर्व योजनांचा फायदा सर्वसामान्य लोकांना मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सातत्याने प्रयत्न केले पाहिजे. केंद्र व राज्य सरकारच्या अनेक योजनांचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना झाल्यास निश्चितपणे ते पाठीशी राहतात त्याचबरोबर राजकारणात काम करत असताना प्रत्येक कार्यकर्त्याने आपण सर्वसामान्य नागरिकांना किती सुविधा उपलब्ध करून देऊ शकतो यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहेत

यावेळी बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, निवडणुकीपूर्वीच ग्रामीण भागाच्या रस्त्यांच्या संदर्भाने ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून ठेवलेला होता त्या कामाचे उद्घाटन आज आपण या ठिकाणी करत आहोत. गावाला दर्जेदार रस्ता मिळाला तर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मदत होऊ शकते ही बाब लक्षात घेऊन अनेक दिवसांची मागणी असलेला ढोकसाळ- वाघोडा तांडा- वाघोडा- वरुड रस्त्यासाठी ९ कोटी ५९ लक्ष रुपये तर ढगी -बोरगाव रस्त्यासाठी ७ कोटी ९५ लाख रुपये मंजूर करण्यात आले असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसासाठी काम करणारा मी कार्यकर्ता असून त्यामुळेच मागील ४० वर्षापासून सर्वसामान्य जनता माझ्यासोबत आहे ८ वेळा निवडणूक लढवलेली असताना ५ वेळा याच सर्वसामान्य लोकांमुळे मला विजय प्राप्त झाला त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची सेवा प्रत्येक राजकीय पदाधिकाऱ्याने करणे अपेक्षित असून लोकप्रतिनिधी म्हणून सातत्याने मी या सर्वसामान्य नागरिकांच्या सुखदुःखात सहभागी आहे मतदारसंघातील सर्वच गाववाडी वस्ती तांडा या



ठिकाणी आवश्यक असणाऱ्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील होतो आणि यापुढे देखील राहील असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

यावेळी राजेश मोरे ज्ञानेश्वर शेजुळ निवासराव देशमुख विक्रम उफाड जिजाबाई जाधव विलास घोडके नाथराव काकडे आनंद जाधव विकास पालवे अशोक डोके सरपंच सचिन राठोड मोहन आडे गजानन उफाड गणेशराव खैरे कृष्णा केंद्रे दिगंबर जायभाये दतराव खराबे डॉ.शरद पालवे राजेश राठोड परमेश्वर शिंदे जानकीराम चव्हाण प्रल्हादराव सरकटे विजय देशमुख सचिन राठोड नितीन साठे सुरेशराव बाहेकर रमेश वायाळ सोपान घोडके संभाजी वायाळ सतीश लोमटे अरुण सदावर्ते प्रमोद भालेकर सुग्रीव चवरे प्रभाकर गाढवे माऊली घुगे महादेव काळे भारत राठोड भाऊसाहेब देशमुख सुरेश राव बाहेकर रावसाहेब बाहेकर परमेश्वर शिंदे सतीश लोमटे नितीन चाटे अतुल राठोड गोपीचंद पवार ज्ञानेश्वर राठोड विजय राठोड अमोल पवार सुरेश राठोड अनिल चव्हाण जनार्दन पवार अविनाश पवार जानकीराम चव्हाण सचिन राठोड विलास देशमुख सुभाष बागल लहू काळे सचिन डोके दत्ता कायंदे सचिन घाडगे लहू काळे सचिन डोके नारायण तिरमले नामदेव कायंदे विष्णू कायंदे रामलाल फते महादेव कायंदे वाघाजी डोके मुरली कायंदे आसाराम कायदे धोंडीबा आघाव भगवान खैरे बबनराव राऊत उद्धव कयंदे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता श्री कोल्हे उपाभियंता श्री मस्के सुरेश ढाकणे विकास तुरेराव राहुल सदावर्ते भगवान केंद्रे माऊली जगताप संजय जगताप सदाशिव साबळे विठ्ठल घुले तानाजी केंद्रे प्रल्हाद बोंढारे मुंजाभाऊ कोकाटे सुरेश राठोड सचिन सांगळे श्याम केंद्रे सुभाष घुले यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

### गुंडेवाडी शिवारात जुगार अड्डावर पोलिसांचा छापा

# ११ आरोपीकडून ३४ लाख ०८ हजार ५२४ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

## जालना स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना खब-या मार्फत गुंडेवाडी शिवारातील मधुकर निकाळजे याचे शेतामध्ये जुगार अड्डा सुरु असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सायंकाळी तांदुळवाडी खुर्द



शिवार गट नं. २७ मधील मधुकर मोहनराव निकाळजे यांचे शेतामध्ये चालु असलेल्या जुगार अड्ड्यावर अचानक छापा मारला असल्याची माहीती आज दि.२२ रविवार रोजी दुपारी दोन वा. च्या सुमारास प्रसिध्दीपत्रकाद्वारे मिळाली आहे. त्याठिकाणी नारायण भगवान काळे वय ३८ वर्ष रा. पोकळवडगाव ता. जालना, संतोष शंकर काळे वय ३५ वर्ष रा. संजयनगर देऊळगाव राजा जि. बुलडाणा, बाळु संपतराव वाघमारे वय २७ वर्ष रा. पीर पिंपळगाव ता. जि. जालना, शेख ईस्माईल शेख इसा वय ४० वर्ष रा. पीर पिंपळगाव ता. जि. जालना, बबन माधवराव म्हस्के वय ५५ वर्ष रा. माळशेंद्रा ता.जि. जालना, राजन छगन वाघमारे वय ४८ वर्ष रा. खडकपुरा देऊळगाव राजा, गोरख गुलाब आढे वय ४० वर्ष रा. मोहाडी तांडा ता.जि. जालना, जावेदखान मोहंमद खान वय ४५ वर्ष रा. गारखेडा सुतगिरणी छत्रपती संभाजीनगर, प्रकाश आगाजी वाहुळे वय ५८ वर्ष रा. दरेगाव ता.जि. जालना, संदीप नारायण चव्हाण वय ४३ वर्ष रा. आडगावराजा जि. बुलडाणा, प्रदीपकुमार अर्जुनराव तांबिले वय ५७ वर्ष रा. डोणगाव ता. जाफ्राबाद जि. जालना यांना ताब्यात घेण्यात आले असुन, त्यांचेकडील रोख रक्कम व जुगार साहित्य, तसेच घटनास्थळावरील वाहने असा एकुण ३४,०८,५२४/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपी विरुद्ध सपोनि. योगेश उबाळे, स्थानिक गुन्हे शाखा जालना यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे चंदनझिरा जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि. योगेश उबाळे, पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, भाऊराव गायके, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, रुस्तुम जैवाळ, कैलास खार्डे, प्रशांत लोखंडे, लक्ष्मीकांत आडेप, संभाजी तनपुरे, रमेश काळे, कैलास चेके, योगेश सहाने, धिरज भोसले, सोपान क्षीरसागर, अशोक जाधवर सर्व स्थागुशा जालना यांनी केली आहे.

# जनजागृती सेवा संस्थेचा चतुर्थ वर्धापन दिन आणि समाजरत्न पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**बदलापूर । प्रतिनिधी -** येथील एबीज सभागृह येथे आयोजित केलेल्या दिमाखदार सोहळ्यात जनजागृती सेवा संस्थेचा चतुर्थ वर्धापन दिन अनेक मान्यवर तसेच उत्साही कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत, उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला. समाजातील अनेक प्रश्नांवर लढणारे, त्यासाठी सर्वस्व अर्पून समाजासाठी कार्यरत असणाऱ्या विविध क्षेत्रातील कार्य संपन्न व्यक्तींना यावेळी समाज रत्न पुरस्कार -२०२५ प्रदान करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी या कार्यक्रमाचा उद्देश सांगताना, समाजाच्या तळागाळात जाऊन काम करणारी ही माणसे म्हणजेच खरेखुरे हिरे असल्याचे प्रतिपादन केले. कित्येक लोक फक्त प्रकाश झोतात राहण्यासाठी किंवा प्रसिद्धी मिळवण्यासाठी कार्यरत असतात तर त्याचवेळी अनेक सामाजिक कार्यकर्ते समाजातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात आपापल्या परीने योगदान देत असतात. त्यांना प्रसिद्धी झोतात राहता येत नाही परंतु त्यांचे यथोचित कौतुक होणे आवश्यक आहे, त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन त्यांचा उत्साह वाढवला पाहिजे यासाठीच या खऱ्याखुऱ्या समाज रत्नांचा आम्ही आमच्या परीने सन्मान करत असल्याचे वक्तव्य त्यांनी केले. जनजागृती सेवा संस्था स्वतः अनेक कार्यक्रमांचे सामाजिक उपक्रमांचे आयोजन करते. शैक्षणिक साहित्य वाटप , सामाजिक विषयांवरील समुपदेशन कार्यक्रम, आरोग्यविषयक शिबिरे किंवा साहित्य वाटप यांसारख्या अनेक कार्यक्रमांच्या माध्यमातून संस्था महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहे. संस्थेच्या या निस्वार्थी समाज उपयोगी उपक्रमामुळे अवघ्या चार वर्षात संस्थेने हजारो कार्यकर्ते जोडल्याचे याप्रसंगी संस्थेच्या सचिव सौ संगीता भंडारी यांनी सांगितले. आजच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना संस्थेद्वारे केलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. आजच्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर महेश अभ्यंकर, दिलीप नारकर, रामजीत गुप्ता, सुनील झळके, अरविंद सुर्वे, दीपक ठुकरुल, सुनील इंगळे, महेश्वर तेटांबे यांसारख्या अनेक प्रतिभावान व्यक्तींची प्रमुख उपस्थिती लाभली.

राष्ट्रपती पदक विजेते माजी कमांडिंग ऑफिसर दिलीप नारकर यांनी याप्रसंगी संस्थेचे कार्याची प्रशंसा करतांना सामाजिक बदलांसाठी समाजातील सजग नागरिकांनी स्वतः सक्रिय राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

दिग्दर्शक महेश्वर तेटांबे यांनी निस्वार्थी सेवा हीच खरंतर संस्थेच्या यशाचे गमक असल्याचे सांगितले. लेखक, अभिनेता पत्रकार या विविध क्षेत्रांचा व्यासंग असणारे महेश्वर तेटांबे यांनी याप्रसंगी बोलताना, इतरांचा सन्मान करण्याच्या , सामाजिक कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणाऱ्या, कार्यकर्त्यांच्या कार्याची दखल घेणाऱ्या या सन्मान सोहळ्याबद्दल समाधान व्यक्त केले व अशाच प्रकारचे सोहळे इतरही ठिकाणी व्हायला हवेत असे मत व्यक्त केले.

डॉक्टर महेश अभ्यंकर यांनी याप्रसंगी बोलताना समाजातील आरोग्य विषयक समस्यांचा गांभीर्यपूर्वक विचार करण्याचा सल्ला दिला . नियमित व्यायाम, संतुलित आहार, शांत सुदृढ मन हे आरोग्यमय आनंदी जीवनाचे महत्त्वाचे आधार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर वाचन संस्कृती



वाढवणे सुदृढ समाज निर्मितीसाठी आवश्यक असल्याचे मग त्यांनी व्यक्त केले व संस्थेने यासाठी पुढाकार घ्यावा, त्यासाठी आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन त्याने संस्थेला दिले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने बदलापूर शहरात कार्यरत असणाऱ्या सिटीजन वेल्फेअर- असोसिएशन या नागरी संस्थेच्या राजेंद्र नरसाळे, सुहास सावंत, डॉ. अमित कुमार गोविलकर, विलास हंकारे, सौ. सुवर्णा इस्वलकर, मंगेश सावंत, आनंद तेंडुलकर, किशोर गुरव इत्यादी पदाधिकाऱ्यांचा व कार्यकर्त्यांचा, तसेच पर्यावरण प्रेमी नानाजी देशमुख यांसारख्या समाज रत्नांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमातील सूत्रसंचालन श्री महेश सावंत सर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन जनजागृती सेवा संस्थेचे खजिनदार दत्ता कडूलकर यांनी केले. आपल्या सर्वांच्या सहकार्याने संस्थेची वाटचाल सुरू आहे आणि अशाच पद्धतीने समाजोपयोगी सामाजिक उपक्रम संस्थेमार्फत राबवले जातील असे आश्वासन देतानाच आपल्यासारख्या जबाबदार जागरूक नागरिकांनी या संस्थेच्या कार्यात हातभार लावावा असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शुभंम नेटके, सार्थक भंडारी, गंधाली तिरपणकर,तेजल उकार्डे, सौरभ टकले, उत्तम नेटके, सुषमा नेटके, समर्थ भंडारी, अमिषा नेटके, श्रुती उरणकर यांनी विशेष परिश्रम घेतले यांच्या अविरत मेहनतीमुळे आजचा हा कार्यक्रम संपन्न झाल्याचे मत कडुलकर यांनी व्यक्त केले .

# डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी पुण्यतिथीनिमित्त बलिदान दिन भाजपा जालना महानगर च्या वतीने साजरा

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनसंघाचे संस्थापक व राष्ट्रहितासाठी आपले संपूर्ण जीवन अर्पण करणारे, बलिदानी डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज दिनांक २३ जून रोजी भाजपा जालना महानगर जिल्ह्यात भाजपा जिल्हा कार्यालयात व सर्व मंडळामध्ये व बलिदान दिन साजरा करण्यात आला. संकल्प से सिद्धी-मोदी सरकारची ११ यशस्वी वर्षे या उपक्रमांतर्गत मंडळ स्तरावर संकल्प सभा व वृक्षारोपण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, रामेश्वर भांदरगे, विजय कामड यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे आयोजन जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन जालना मंडळ, जुना जालना मंडळ, पूर्व जालना मंडळ आणि महानगर ग्रामीण मंडळात विविध ठिकाणी करण्यात आले.

नवीन जालना मंडळाचे अध्यक्ष श्री. सुनील खरे यांनी सांगितले डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांचे बलिदान म्हणजे भारताच्या एकतेसाठी दिलेली अजरामर प्रेरणा आहे. त्यांच्या विचारांनीच आजची तरुण पिढी राष्ट्रासाठी कार्य करण्याचा संकल्प करते.

पूर्व जालना मंडळाचे अध्यक्ष अमोल धानुरे यांनी व्यक्त केले, मुखर्जींचा संकल्प म्हणजे भारताच्या आत्मनिर्भरतेचा पाया. आजचा कार्यक्रम हा त्या विचारांची कृती आहे.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व बंधू-भगिनीं मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमांमध्ये डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या राष्ट्रनिष्ठ विचारांची उजळणी करण्यात आली. त्यांच्या त्यागाचे स्मरण करत उपस्थितांनी राष्ट्रनिर्मितीसाठी स्वतःला समर्पित करण्याचा संकल्प केला.

सोपान पेंढारकर, अर्जुन गेही, सकुबाई पणबिसरे, शुभांगी ताई देशपांडे, वर्षा ठाकूर, ममता कोंड्याल, उषाबाई धुमाळ, किर्ती आर्य, प्रभुलाल गोमतीवाले, राजेंद्र भोसले सर, रवी अग्रवाल, देवीदास देशमुख, राजेश जोशी, सिद्धीविनायक मुळे, सुनील पवार, शिवराज जाधव, राजु गवई, अनिल सरकटे, विष्णू भुतेकर, नेमिचंद भुरेवाल, सुजित जोगस, सुमित सुरडकर, विकास कदम, रतन आर्य, बाबुराव भवर, सोमेश काबलिये, जगदीश येनगुपटला, डोंगरसिंग साबळे, आकाश देशमाने, तुकाराम बखळे, बद्रीनाथ वाघ, रोहित नलावडे, बबलु नंद, नितिन भगत, उमेश पेंढारकर, चंदन मिश्रा, आक्षिश साखरे, आमोल भालेराव, राम व्यवहारे, संजय साखरे नितिन नरवये, सतोष पांढरे, राधाकिसन वाघचौरे, पारचा भाऊ, रणजित रिडला, सतोष यादव, मोहन सूर्यवंशी, सुभाष अंबेकर व किरण देशमुख आदींसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# सनातन संस्थेच्या वतीने अधिवक्ता हरि शंकर जैन यांना ‘हिंदु राष्ट्ररत्न’ पुरस्कार

## मंत्री कपिल मिश्रा, चित्रपट निर्माते विपुल शहा, अधिवक्ता संजीव पुनाळेकर, गौरीशंकर मोहता, शिल्पकार प्रमोद कांबळे यांना ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार !

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** सनातन संस्थेच्या वतीने १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत फोंडा, गोवा येथे पार पडलेल्या ‘सनातन राष्ट्र शंखनाद’ महोत्सवात हिंदु धर्मासाठी आणि राष्ट्ररक्षणासाठी विशेष कार्य करणार्या अनेकांना ‘हिंदु राष्ट्ररत्न’ आणि ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार घोषीत करण्यात आले होते. त्यापैकी पुरस्कार प्राप्तकर्ते दिल्ली येथील ‘हिंदु फ्रंट फॉर जस्टिस’चे अध्यक्ष पू. अधिवक्ता हरि शंकर जैन यांना ‘हिंदु राष्ट्ररत्न’, तर दिल्ली राज्याचे कला आणि सांस्कृतिक मंत्री श्री. कपिल मिश्रा, मुंबई येथील प्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक श्री. विपुल शहा, मुंबई येथील हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय सचिव अधिवक्ता संजीव पुनाळेकर, ऋषिकेश येथील गीता भवनचे श्री. गौरीशंकर मोहता आणि अहिल्यानगर येथील प्रसिद्ध भारतीय शिल्पकार, आणि चित्रकार श्री. प्रमोद कांबळे यांना संतांच्या हस्ते ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार देऊन त्यांचा नुकताच सन्मान करण्यात आला आहे.

मंदिर मुक्तीसाठी संघर्ष : श्रीराम मंदिर, तसेच उत्तरप्रदेशातील काशी, मथुरा, मध्यप्रदेशमधील भोजशाळा आदी मंदिरांच्या मुक्तीसाठीही विनामूल्य न्यायालयीन लढा देणारे प्रखर धर्माभिमानी अधिवक्ता (पू.) हरि शंकर जैन यांना हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे यांच्या शुभहस्ते दिल्ली येथे ‘हिंदु राष्ट्ररत्न’ पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पू. हरि शंकर जैन यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, ‘‘हा पुरस्कार प्राप्त झाल्याने नवीन कार्य करण्यासाठी ऊर्जा मिळाली आहे. जोपर्यंत आयुष्य आहे तोपर्यंत अनेक मंदिरांच्या मुक्तीचे कार्य पूर्ण करणे ही आमची जबाबदारी समजून ते पूर्ण करणार.’’

हिंदु इकोसिस्टमधून संघटन : हिंदु इकोसिस्टमच्या माध्यमातून लेखक, प्राध्यापक, वैज्ञानिक, कलाकार, इतिहासकार आणि धर्मप्रेमी यांना एकत्रित करून धर्म आणि राष्ट्र सेवेसाठी एक प्रभावी व्यासपीठ निर्माण करणारे, तसेच दिल्ली दंगलीत हिंदूंना साहाय्य करणारे दिल्लीचे कला आणि संस्कृती मंत्री श्री. कपिल मिश्रा सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे यांच्या शुभहस्ते दिल्ली येथे ‘हिंदु राष्ट्ररत्न’ पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. मनोगत व्यक्त करताना मंत्री श्री. कपिल मिश्रा म्हणाले, ‘‘गोवा येथे झालेल्या महोत्सवात केलेल्या शंखनादाचा आवाज वर्षानुवर्षे घुमेल. अशा प्रकारचा शंखनाद महोत्सव दिल्ली येथेही व्हावा अशी विनंती आहे.’’ अशाच प्रकारे ऋषिकेश येथील गीता भवनचे श्री. गौरीशंकर मोहता यांचा सद्गुरु (डॉ.) पिंगळे यांनी ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार देऊन सत्कार केला.

सत्य व संवेदनशील विषयावर चित्रपट निर्मिती : श्री. विपुल शहा यांनी ‘द केरला स्टोरी’ आणि ‘बस्तर : द नक्षल स्टोरी’ या चित्रपटांच्या माध्यमातून ‘लव्ह जिहाद’ व नक्षलवाद यांसारख्या संवेदनशील सामाजिक विषयांवर प्रकाश टाकला. त्यांनी या सत्यघटनेवर आधारित चित्रपटांद्वारे केवळ व्यावसायिक यशच मिळवले नाही, तर संपूर्ण जगभरात मोठी जागृती घडवण्याचे कार्यही प्रभावीपणे केले. अशा सत्यनिष्ठ आणि राष्ट्रभक्त चित्रपट निर्माता-दिग्दर्शक श्री. विपुल शहा यांचे मुंबई येथे सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सद्गुरू अनुराधा वाडेकर यांनी ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार देऊन सत्कार केला. मनोगत व्यक्त करताना श्री. विपुल शहा म्हणाले, ‘‘सनातन धर्मश्री पुरस्कार स्वीकारताना मी भावान्वित आणि आनंदी झालो आहे. या पुरस्काराने मला प्रेरणा मिळेल, ज्यामुळे आपल्या हिंदू समाजासाठी माझ्या कामाच्या माध्यमातून अजून काही चांगल्या चित्रपटाची निर्मिती करता येईल तसेच जागृती आणि निरंतर प्रयास चालू राहील.’’

निरपराध हिंदू व सामान्य जणांना साहाय्य : काँग्रेसच्या काळात ‘हिंदु आतंकवादी’ ठरवण्यासाठी भयानक षड्यंत्रे करून हिंदुत्वनिष्ठांना विविध प्रकरणांमध्ये अडकवण्यात आले. अशा वेळी अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांनी मालेगाव बॉंबस्फोट प्रकरण, मडगाव बॉंबस्फोट प्रकरण, तसेच अनेक खटल्यांमध्ये हिंदुत्वनिष्ठ व सामान्य जणांना विनामूल्य साहाय्य करून सत्य बाजू त्यांनी समाजात ठामपणे मांडली. त्यांचा सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सद्गुरू अनुराधा वाडेकर यांनी ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार देऊन सत्कार केला. या वेळी मनोगत व्यक्त करताना अधिवक्ता पुनाळेकर म्हणाले, ‘‘आता राष्ट्र आणि धर्म यांच्या कार्यासाठी अनेक अधिवक्ते पुढे आले आहेत. ज्या ज्या अधिवक्त्यांनी माझ्यासोबत काम केले आहे त्या सर्व अधिवक्त्यांचा हा बहुमान आहे आणि अधिवक्त्यांचा प्रतिनिधी म्हणून मी नम्रपणे स्वीकारत आहे. जोपर्यंत हिंदु राष्ट्राची स्थापना होत नाही, तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही.’’

आध्यात्मिक व सांस्कृतिक कलानिर्मिती : प्रसिद्ध भारतीय शिल्पकार आणि चित्रकार श्री. प्रमोद कांबळे यांना सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरू श्री. नंदकुमार जाधव यांनी नगर येथे ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार देऊन सत्कार केला. श्री. प्रमोद कांबळे यांनी स्वामीनारायण मंदिरासाठी स्वामीनारायण यांच्या जीवनावर आधारित १० भव्य सेट्स, ‘सारे जहां से अच्छा’ या नावाने ५०० महान भारतीय व्यक्तींचे विशाल पेन्सिल स्केच, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनेक मूर्ती, तसेच शिर्डीच्या प्रसादालयामध्ये ७० फूट उंच साईबाबांची मूर्ती घडवली आहे. अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या परिक्रमा मार्गावर भगवान श्रीरामाच्या जीवनाशी संबंधित १२५ चित्ररथ त्यांच्या दिशादर्शनाखाली तयार झाल्या आहेत. श्री. कांबळे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, ‘‘या पुरस्कारासाठी मी स्वतःला भाग्यशाली समजतो आणि पुढील कार्य करण्यासाठी मला यातून प्रेरणा मिळेल.’’



मे महिन्यात संपन्न झालेल्या ‘सनातन राष्ट्र शंखनाद’ महोत्सवात सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या ८३ व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या शुभहस्ते हस्ते ४ जणांना ‘हिंदु राष्ट्ररत्न’, तर २१ जणांना ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार देऊन गौरवण्यात आले होते. त्या वेळी देशस्तरावर आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय चेतना निर्माण करणार्या गोव्यातील ऐतिहासिक अशा सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाला भारतासह २३ देशांतील ३० हजारांहून अधिक लोकांनी सहभाग घेतला. त्याचप्रमाणे आताही सनातन संस्थेच्या वतीने १ जणांना हिंदु राष्ट्ररत्न, तर ५ जणांना ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.